लोकमत

# विद्यापीठात मोफत क्रिकेट प्रशिक्षण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आज, रविवार ते २० मे पर्यंत ७ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर संकुलाच्या मैदानावर सकाळी ७ ते ९ या कालावधीत हे उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिर होईल.

Hello Kolhapur
Page No. 4 May 05, 2019
Powered by: erelego.com

# विद्यापीठात क्रिकेट प्रशिक्षण शिबिरास आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे दि. ५ ते २० मे या कालावधीत ७ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर संकुलाच्या मैदानावर सकाळी ७ ते ९ या कालावधीत हे उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिर होईल. विद्यापीठाचे हंगामी प्रशिक्षक सुचय खोपडे व विद्यापीठाच्या माजी महिला क्रिकेटपटू चंदाराणी कांबळे शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांनी केले आहे.

## शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर :** डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन 'कमवा आणि शिका' योजना सुवर्णमहोत्सवी वर्ष व शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त दि. ५ मे रोजी सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रा. आनंद पाटील हे 'इतिहास घडविणारे इतिहासकार डॉ. आप्पासाहेब पवार' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

My Kolhapur Edition
5 May, 2019 Page No. 3
Powered by : erelego.com